UGC, Pune & S.R.T.M. University, Nanded Sponsored

# Three Days International Interdisciplinary Conference in Hindi, Marathi, Urdu & English on

## लोक साहित्य : वैश्विक परिदृश्य

## लोक साहित्य : जागतिक परिप्रेक्ष्य

## لوک ادب : عالمی تناظر

## Folk Literature : Global Perspective (FLGP-2016)

**28, 29, 30 January, 2016**

(FLGP-2016)

**Marathi :Volume :2**


Edited By :
Dr. G.N. Shinde
Dr. S.W. Jagtap
Dr. V.R. Deshmukh


ISBN-978-81-923487-2-8

# लोकसाहित्य आणि धर्म एक आकलन

*सरस्वती ल. अंदेलवार
**प्रा.डॉ. शारदा कदम
*पीपल्स कॉलेज, नांदेड,
**बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत, जि. हिंगोली.

**प्रस्तावना :-**

आज मराठीत लोकसाहित्य हा शब्द इंग्रजी-फोकलोअर शब्दाचा पर्याय शब्द म्हणून रूळला असला, तरी त्यातील 'साहित्य' हा शब्द मराठीत आधीच वाड्:मय (लिटरेचर) या अर्थाने रूढ असल्याने जे शब्दबध्द (शब्द) असे कथा गीतादी साहित्य म्हणजेच लोक साहित्य असे समजले जाते. परंतु लोकसाहित्य म्हणजे केवळ वाड्:मय विचार नाही. तो संहिता . सादरीकरण . परिसर . काल या साऱ्यामिळून समजावून घ्यावयाचा अनुभव आहे. एका अर्थाने हा अभ्यास एका तौलनिक अभ्यास शास्त्राचा विषय आहे.

जगातल्या विविध मानव समुहांची स्वभाव वैशिष्टे त्यातील साम्य आणि त्यातील वेगळेपणा लोकसाहित्यात येतो. संस्कृतीचे ते महत्वाचे अंग आहे. हे लोकसाहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे स्थलकाल सापेक्ष बदल स्वीकारत पुढे पुढे जाते. यात सामाजिक बाबी असतात. नव्या जीवनसंदर्भात कुतूहलही असते. एकूणच लोकमानसाचे विविध वाङ्यीन, सांस्कृतिक कलात्मक अविष्कार 'लोकसाहित्य' या संज्ञेने सूचित होतात. फोकलोअर या अर्थी मराठीत लोकसाहित्य वा लोकविद्या या संज्ञा रूढार्थाने वापरल्या जातात व त्यांचा आशय कित्येकदा परस्परव्याप्त असल्याचे दिसून येते.

त्याचबरोबर भारतीय समाज हा परंपराप्रिय आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या रूढी, प्रथा, परंपरा, लोकसंकेत, लोकविधी, आचार - विचार, हे सर्व धर्म आणि लोकजीवनाच्या संस्कारातून मौखिक रूपाने लोकसाहित्याची निर्मिती होत असते.

**उद्दिष्टये :-**

१) लोकसाहित्य आणि धर्म केवळ अभ्यास विषय नसून तो प्रत्यक्ष जीवनाचा भाग कसा आहे, याचा शोध घेणे/अभ्यासणे.
२) लोकसाहित्य आणि धार्मिक संस्कृती यातील एकरूपता स्पष्ट करता येईल.
३) लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी धार्मिक विधी आणि संस्कृतीचे सहाय्य अपरिहार्य आहे. हे स्पष्ट करता येईल.
४) धर्म आणि लोकसंस्कृती म्हणजेच लोकसाहित्य होय, हे अभ्यासणे.

**गृहितके :-**

१) लोकसाहित्य आणि धर्म यांचे मौलिक संशोधन करणे.
२) लोकसाहित्यातून धार्मिक विधींचे जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे.
३) धार्मिक आणि संस्कृतिक वारसा, परंपरा जपण्यासाठी नवतेचा शोध घेणे गरजेचे आहे.
४) लोकसाहित्यातील 'लोक' या शब्दाचे विस्तारीत रूप समजून घेणे.

**'लोक' या पदाचे स्पष्टीकरण :-**

मराठीत लोकसाहित्य हा शब्द थ्वसासवतम या इंग्रजी शब्दासाठी वापरला जातो. महाराष्ट्रात लोकसाहित्याचे संकलन आणि लेखन १८५८ पासुन सुरु आहे. १९२० साली कै. वि. का. राजवाडे यांनी लोकगीत, लोककथा हे पारिभाषिक शब्द वापरले होते. दत्तो वामन पोतदार यांनी थ्वसासवतम चे भाषांतर म्हणुन 'लोकविद्या' हा शब्द वापरला. पुढे यासाठी 'लोकवाङ्य हा शब्द वापरण्यात येऊ लागला. दुर्गा भागवत यांनी देखील 'लोकसाहित्य' हा शब्द सुचविलेला आहे. लोकयान, लोकसंस्कृती, लोकवार्ता हे शब्द पर्यायी वापरले जातात. थ्वसासवतम हा शब्द विलीयम थॉम्स १८४६ यांनी प्रथम वापरला. तसे लोकसाहित्याची एकच अशी व्याख्या करणे कठीण आहे. हा सामासिक शब्द ' लोक' व 'साहित्य' या दोन पदांच्या संयोगाने बनलेला आहे. महाराष्ट्र शब्दकोशात 'लोक' या शब्दाचा अर्थ जन, मनुष्य, समाज, वर्ग, संघ, जात, राष्ट्र, देश राज्य, प्रांत, असे निरनिराळे नाव दिले आहेत. या शब्दात समाज विशेषतः विशिष्ट समाज या अर्थाने 'लोक' या शब्दाची योजना केलेली दिसते.

**'लोक' या शब्दाची भारतीय परंपरा :-**

Folk या पदासाठी मराठीत 'लोक' हे पद वापरण्यात येते. त्याची भारतात एक परंपरा आहे. लोंक हा शब्द सिध्दांतकौमुदीत संस्कृतीतील लोकदर्शने धातूपासुन निष्पन्न झाल्याचे दर्शविले आहे. या धातूचा अर्थ पाहणे असा होतो. यावरून 'लोक' या शब्दाचा अर्थ पाहणारा अर्थात पाहण्याचे कार्य करणारा जनसमुदाय असा होतो.

 ISBN : 978-81-923487-2-8

१) ऋग्वेदातील प्रसिध्द पुरूष सुक्तात 'लोक' हा शब्द जन आणि स्थान या दोन्ही अर्थाने वापरला आहे.

२) वैय्याकरण पाणिनी यांनी आपल्या अष्टाध्यायात लोक व सर्वलोक या पदांचा उल्लेख केला आहे.

३)वररूचीने आपल्या वार्तिकातही लोक हा शब्द वापरला आहे.

४) भरताच्या नाट्यशास्त्रातील १४ व्या अध्यायात नाटयधर्मी आणि लोकधर्मी प्रवृत्तींची चर्चा केली आहे.

५) भगवद्गीतेत लोक आणि लोकसंग्रह या शब्दाचा वापर अनेक ठिकाणी केला आहे. श्रीकृष्णाने
लोकसंग्रहावर विशेष भर दिला आहे.

६) अशोकाच्या शिलालेखात 'लोक' हा शब्द व्यापक अर्थाने वापरण्यात आला आहे.

आजदेखील लोकसत्ता, लोकशाही अशा शब्दांमध्ये हे पद समस्त प्रजा आणि सर्व जनता या अर्थाने वापरण्यात येते.

**लोकसाहित्य म्हणजे काय ?**

**व्याख्या :-**

१) जोनास बॅलिस यांच्या मते- लोकसाहित्य हे आदिमानवनिर्मित असुन परंपरा प्राप्त असते. त्याचप्रमाणे ते सुसंस्कृत मानवाने निर्मिलेले असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्याव्दारे पद्य किंवा गद्य स्वरूपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, रूढी, लोककलाप्रकार त्याचप्रमाणे नृत्य नाटय इ. चा अंतर्भाव त्यात होतो. लोकसाहित्य हे समूहाच्या अविष्काराचे शास्त्र नाही, तर लोकसमूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या अविष्काराचे शास्त्र आहे.

२) डॉ. ना. गो. नांदापूरकर :- लोकसाहित्य म्हणजे माझ्या दृष्टीने तरी लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने आलेले वाङ्मय होय. याचा कर्ता लोकच अर्थात अज्ञात अशी लोकमानसातील व्यक्ती. यास्तव लोकांनी केलेले, लोकभाषेत केलेले आणि लोकांच्या परंपरेने चालत आलेले जे वाङ्‌मय तेच लोक वाङ्‌मय होय. वाङ्‌मयाच्या या प्रकारात लोककथा, कहाण्या, आहाणे, उखाणे आणि लोकगीते येतात.

३) डॉ. सरोजिनी बाबर :- विविध प्रकारांच्या जातिवंत स्वर - विलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कितीक वर्षामागे रचले असतानी पाठांतराच्या बळावर पिढयानपिढया आपल्या नववोन्मेषशालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे ते लोकसाहित्य.

समुहमनाच्या प्रेरणेने जे निर्माण होते व परंपरेने आपोआप एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येते ते सर्व लोकसाहित्य होय.

**लोकसाहित्य आणि धर्म :-**

लोकजीवनात प्रचलित असलेल्या मौखिक परंपरेबरोबरच लोकरूढी लोकविश्वास विधी इत्यादींचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. पर्यायाने लोकसंस्कृती आणि लोक धर्म यांचाच हा अभ्यास असतो. डॉ. स. अं. डांगे यांनी लोकांमध्ये प्रचलित असलेल्या रूढींना आणि विधींना अश्वत्यांच्या मुळ्यांची उपमा दिली आहे. प्राचीन काळापासून प्रचलित असलेल्या या रूढीविधींचे मूळ आज अनाकलनीय आणि अगम्य झाले आहे. लोक संस्कृतीमध्ये असलेल्या विशेषांची दुर्बोधता आणखिही एका बाबीमुळे वाढली आहे. 'वैदिक लोक' या दोन्हीही परंपरांचे प्रवाह लोकसंस्कृतीत मिसळले आहेत.

**लोकधर्म :-**

'' लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे ज्या समाजाचे ते साहित्य असते त्या समाजाच्या सांस्कृतिक समजूतींचा, श्रध्दांचा, रूढींचा व जीवनावर नियत्रंण करणाऱ्या घटकांचा अभ्यास होय'

– श्री. नरहर कुरूंदकर

जगातील सर्व लोकसमूहांवर धर्मभावनेचा पगडा असलेला दिसून येतो. आपण ज्याला धर्म म्हणतो त्याला इंग्रजीत रिलीजन हा शब्द आहे. 'रेलिगारे' या लॅटिन धातूपासून तो आला आहे. त्याचा अर्थ बांधून टाकणे असा आहे. दैवी आदेशाने मानवी जीवन नियंत्रित करणारा आचार विचारांची बांधणी करणारा तो 'रिलिजन' अशी त्याची व्याख्या आहे. यावरून पाश्चात्यांची धर्मविषयक विचारसरणी आणि जीवन - सरणीही प्रामुख्याने मानव - केंद्रीत आहेत असे दिसून येते. मानव हा इतर मनुष्येतर सृष्टीहून वेगळा असल्याने त्यालाच धर्मसाधनेव्दारा ईश्वराशी नाते जोडता येते. ग्रीक तत्वज्ञानांच्या मानवकेंद्रीत विचारातून खिस्तीधर्मातील ही जीवनदृष्टी आकारास आली आहे. त्यामुहे इतर सृष्टीचा विचार गौण म्हणून केवळ मानवतावादावर त्यात अधिक भर दिलेला आहे.

भारतीयांचा धर्म याहून वेगळ्या वाटेने जाणारा आहे. त्यात मानवतावादासोबतच विश्वात्मैक्यभावाला अधिक प्राधान्य दिलेले आहे. मनुष्यासहित सर्व सृष्टी वस्तुतः एकच आहे. त्यामुळे हिंदूधर्मात मानवतावादापेक्षा सर्व भूताहित व जीवदया या कल्पनांचा प्रभाव अधिक आहे. समदृष्टीची कल्पना ही केवळ मानवकेंद्रीत व राहता विश्वात्मैक्यभाव प्रकट करणारी आहे. इतराहून वेगळे असलेल्या आमच्या धर्मकल्पनेत याचे मूळ आहे.

'धर्म' हा शब्द ''धृ''म्हणजे धारणा करणे. या धातूपासून निघालेला आहे. समाजाची धारणा करतो तो धर्म त्याची अधिक विस्तृत व्याख्या अशी :-

 ISBN : 978-81-923487-2-8

'' एका विशिष्ट जनसमूहाची एकत्र धारणा करण्यास उपयुक्त अशा आचारांची विश्वासांची आणि दैवतांची परंपरा म्हणजे धर्म होय''.

''धारणादधर्ममित्याहुर्धर्मो धारयते प्रजा:
य: स्याध्दारणसंयुक्त स धर्म इति निश्चय:''

अशी व्यासांनी, तर नारायणोपनिषतात :–

''धर्मो विश्व जगत: प्रतिष्ठा धर्मे सर्व प्रतिष्ठितम्:''

अशी धर्माची व्याख्या केली आहे. यावरून हा धर्म केवळ मानवी जीवनापुरताच मर्यादित न राहतात. तो संपूर्ण सृष्टीला आपल्या कवेत घेणारा असल्याचे लक्षात येते. ढोबळमानाने धर्माची कल्पना देवयज्ञ पर किंवा नित्यनैमित्यिक कर्मपर मानली जाते. परंतु भारतीय जन जीवनात धर्म आणि समाज कधीच विलग राहिले नाहीत. त्यामुळे सामाजिक जीवनातील प्रत्येक अंग धर्माने प्रभावित झालेले दिसून येते. असाच मानवतेचा विशाल पसारा असतो. यातून समाजसापेक्ष अशा लोकधर्माची निर्मिती होते.

''पारंपरिक मन हे आदिम लोकमानसाशी मौलिक संबंध राखूनच प्रगती साधीत असते. त्याचा विकासाचा वेग गगनावर पसरलेला असला तरी त्याची मूळे आदिम धारणातच खोलवर रूजलेली असतात''. यामुळे कोणत्याही लोकसंस्कृतीला स्थायी स्वरूप प्राप्त होते. या लोकसंस्कृतीतच जनजीवनाचा व्यापक लोकधर्म अंतर्भूत असतो.

**लोककथा आणि लोकगीते यांचा धर्मविधीशी संबध :–**

भारतीय लोकांची प्राचीन काळापासून कथा आणि गींता कडे बघण्याची दृष्टी, भाविकांची ओढ त्यांनी कथांना आणि गीतांना व्यक्तित्व व देवत्व अर्पण केले आहे. त्यांच्यात अतिमानुष शक्ती आहे. त्यांचे आवाहन केले जाऊ शकते अशी श्रध्दा बाळगली. भारतीयांची कथा गीतांसंबधी ही दृष्टी बनण्याचे कारण हे आहे की, भारतात कथांची परंपरा फार प्राचीन आहे. गोष्टी, म्हणी, उखाणे, गाणी यांचा उपयोग भारतीयांनी आपल्या धर्माचारात बांधीव पध्दतीने केला आहे. आजही येथील समाजात रूढ असलेल्या अनेक लोककथा आणि लोकगीते यांचा धर्मविधींशी संबध असतो. ही गीते किंवा कथा विधिचे अविभाज्य भाग असतात. गीतांचा अभ्यास करताना जनमानसात प्रचलित असलेली धर्मभावना लक्षात घ्यावी लागते. भारतातील लोकसंस्कृती धर्म प्रधान आहे. लोक संस्कृतीच्या क्षेत्रात येणाऱ्या देवदेवता, त्यांचे उपासनाविधी, नवस प्रकार, कुलधर्म, कुळाचार, सण, व्रते, उत्सव यात्रा, संस्काराविधी इ. पाहिल्यास याचा प्रत्यय येऊ शकेल. लोक देवतांचा त्यासंबधीच्या विधी विधानांचा फार मोठा प्रभाव लोकजीवनावर आहे.

**सारांश :–**

लोकसाहित्य म्हणजे लोकांनी निर्माण केलेले साहित्य होय. लोकांनी केलेले लोकभाषेत केलेले आणि लोकांच्या परंपरेने चालत आलेले जे वाड्मय तेच लोकवाड्मय आणि लोकसाहित्य होय. धार्मिक विधी म्हणजे धार्मिक कृत्य असा त्याचा अर्थ होतो. आणि धार्मिक कृत्य म्हणजेच लोकविधी होत. लोकविधीनांच धर्म म्हणून ओळखले जाते.

भारतीय ग्रामजीवन हजारो वर्षे गुण्यागोविंदाने नांदत आले याचे महत्वाचे कारण म्हणजे येथे सहज, निसर्गत: चालत आलेला सर्वसमावेशक लोकधर्म हे आहे. येथील लोकजीवनातून लोकसाहित्य आणि धर्म घडलेला आहे.

**निष्कर्ष :–**

१) लोकसाहित्य आणि धर्म यांचा अत्यंत घनिष्ठ संबध आहे.
२) लोकसाहित्यातून लोकसंस्कृती आणि धार्मिक विधींचे भावपूर्ण दर्शन घडते.
३) धार्मिक विधीतून संस्कृतीचे जतन व संवर्धन होत असते.
४) काळाच्या ओघात धार्मिक विधींचा त्याग न करता नवस्वीकृती केलेली आहे.
५) मानवतेच्या या विशाल पसाऱ्यातून समाजसापेक्ष लोकधर्माची निर्मिती झाली आहे.
६) धर्म आहे म्हणून संस्कृती आहे, संस्कृती आहे तर सभ्यता आहे, सभ्यता आहे म्हणून माणूस आहे, माणूस आहे म्हणून मानवी समाज आहे.

**संदर्भ :–**

१) डॉ. प्रभाकर मांडे :– लोकसाहित्याचे स्वरूप
२) विठ्ठल वाघ :– वऱ्हाडी म्हणी आणि लोकधर्म, लोकवाड्:मय ग्रह, मुंबई.
३) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ :– वाड्:मय प्रवाह, लोकसाहित्य, संत साहित्य, महानुभाव आणि पडींती साहित्य
४) संदर्भ नोट्स :– अक्षयानंद, संदर्भ क्लासेस, शुक्रवार पेठ, योगेश्वरी पार्क सोसायटी, पुणे.
५) डॉ. द.ता.भोसले :– लोकजीवन आणि लोकसंस्कृती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई.
६) प्रा. डॉ. बाळकृष्ण कवठेकर, प्रा. डॉ ल. का. मोहरीर :– लोकप्रज्ञा (अविष्कार आणि स्वरूप ) प्रकाशक–गुरूवर्य डॉ. प्रभाकर मांडे अमृत महोत्सव समिती औरंगाबाद

 ISBN : 978-81-923487-2-8